# प्रेसनोट

ला.प्र.विभाग, धुळे

दिनांक २९.०८.२०२५

**लोकसेवक गणेश पितांबर बडगुजर, तंत्रज्ञ, म.रा.वि.वि.मर्या. ग्रामीण उपविभाग – ०१, धुळे यांनी तक्रारदार यांचेकडे १,५००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धुळे |
| **पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | धुळे तालुका पो.स्टे. गुरनं. ५३८/२०२५ |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्र.प्र.कायदा कलम ७ प्रमाणे, दि.२९.०८.२०२५ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | गणेश पितांबर बडगुजर, वय ३० वर्षे, तंत्रज्ञ म.रा.वि.वि. मर्या. ग्रामीण उपविभाग – ०१, धुळे |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १,५००/– रुपये |

**<u>थोडक्यात हकिगत :–</u>** तक्रारदार यांनी त्यांच्या पत्नीच्या नांवे मौजे चितोड, ता. धुळे येथे पंतप्रधान आवास योजने अंतर्गत नविन घराचे बांधकाम केले असुन सदर घरास नविन विज कनेक्शन मिळणेकरीता दि.०२.०६.२०२५ रोजी म.रा.वि.वि. कंपनी कडे आवश्यक त्या कागदपत्रासह ऑनलाईन अर्ज करुन त्याकरीता १,६२०/– रुपये फि भरली होती.

त्यानंतर तक्रारदार यांनी वेळोवेळी म.रा.वि.वि. कंपनी ग्रामीण उपविभाग – ०१, धुळे या कार्यालयात जावुन सहायक अभियंता वसिम तडवी यांची भेट घेतली असता त्यांनी यातील आलोसे यांना फोन करुन तक्रारदार यांचे घरास नविन मिटर बसविणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी आलोसे यांची भेट घेतली असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे नविन मिटर बसविण्याचे काम करुन देण्यासाठी १,५००/– रुपये लाचेची मागणी करुन पैसे दिल्याशिवाय मिटर बसवुन मिळणार नाही असे सांगितल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात दि.२८.०८.२०२५ रोजी तक्रार दिली होती.

त्यानंतर दि.२८.०८.२०२५ रोजी सदर तक्रारीची पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे १,५००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम दि. २९.०८.२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडुन स्वत: स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **सापळा पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| **सापळा अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धुळे |
| **सापळा पथक** | श्रीमती पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक<br>पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, रामदास बारेला, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, जगदीश बडगुजर, ला.प्र.वि. धुळे |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**संपर्क पत्ता** :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे

**संकेतस्थळ** :– acbmaharashtra.gov.in

**ईमेल** :– dyspacbdhule@gmail.com

**टोलफ्री क्रमांक** :– १०६४

**दुरध्वनी क्रमांक** :– ०२५६२–२३४०२०

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे (मोहर)

**(सचिन साळुंखे)**
**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे.**